# आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय

जुने जकात घर , दुसरा मजला, शहीद भगतसिंग रोड, फोर्ट मुंबई ४०० ००१.

Email- excise_jtcom_molassesalcohol@mahaonline.gov.in

Tel No. Jt. Commr. २२६२०२३८ Fax No. २२६६ २३७०.


==============================================================

वाचले:- या कार्यालयाचे क्रमांक- एमआयएस ११२०१४/२४६२/५-ब दि. १७.०७.२०१४ चे परिपत्रक.

क्रमांक:- एमआयएस ११२०१४/२४६२/५-ब मुंबई, दि. १८ मार्च, २०१५.

## परिपत्रक

विषय :- भारतीय अन्न सुरक्षा व प्रमाणक प्राधिकरण (FSSAI) अन्वये मद्यांच्या बाटल्यावरील लेबलवर छापण्यात यावयाच्या मजकूराबाबत.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने या कार्यालयाच्या समक्रमांकाच्या दिनांक १७.०७.२०१४ च्या परिपत्रकान्वये भारतीय अन्न सुरक्षा व प्रमाणक प्राधिकरण (FSSAI) नवी दिल्ली यांच्या दि. ३१.१०.२०१३ च्या अधिसुचनेन्वये देशात अन्न सुरक्षा कायदा लागू करण्यात आला असल्याने दि. ०१.०१.२०१५ पासून मद्यांच्या बाटल्यांवर सदर अधिसुचनेतील निर्देशानूसार मजकूर छापणे बंधनकारक करण्यात आल्याचे कळविले होते. परंतू FSSAI प्राधिकरणाने दि. १६.१२.२०१४ च्या आदेशान्वये अंमलबजावणीची तारीख दि. ०१.०७.२०१५ पर्यंत वाढविली आहे. त्यामुळे आपणास कळविण्यात येते की, दि. ३०.०६.२०१५ पर्यंत उत्पादित मद्य साठयावर जुना मजकूर असलेल्या लेबल्सचा वापर करता येईल. व जुना मजकूराच्या लेबलचा वापर करुन दि. ३०.०६.२०१५ पर्यंत उत्पादित केलेला मद्य साठा दि. ३०.०९.२०१५ पर्यंत वितरीत करता येऊ शकेल. मात्र दि. ३०.०९.२०१५ नंतर या संदर्भात

T/24/3/15

विभागीय उप-आयुक्त,
राज्य उत्पादन शुल्क,
नाशिक विभाग, नाशिक यांचे कार्यालय
आवक क्रमांक 382
दिनांक 24/3/2015
विभाग

कोणत्याही प्रकारची मुदतवाढ देण्यात येणार नाही. व FSSAI प्राधिकरणाच्या तरतुदींचा कोणताही भंग होणार नाही याची सर्वस्वी जबाबदारी आपणावर राहील.

**<u>मा. आयुक्तांच्या मान्यतेने.</u>**

**(विश्वनाथ इंदिसे)**
**सह आयुक्त (मळी/ मद्यार्क)**
**आयुक्तांकरिता.**

**प्रति,**

1. सर्व विभागीय उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क.
2. सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क.
3. सर्व पीएलएल/ बीआरएल/ सीएल-१ अनुज्ञप्तीधारक.
4. सर्व पीएलएल/ बीआरएल/ सीएल-१ अनुज्ञप्तीवरील प्रभारी अधिकारी.
5. या कार्यालयातील सर्व राजपत्रित अधिकारी.
6. अभिलेख शाखा. (५ प्रती).